नविन लेखाशिर्ष उघडणेबाबत
मा. संसद सदस्य आणि विधिमंडळ सदस्य यांचा समावेश असलेली फौजदारी प्रकरणे चालविण्यासाठी स्थापन केलेल्या एका विशेष न्यायालयाकरीता स्वतंत्र लेखाशिर्षाबाबत...

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक: विशेन्या १३१८/प्र.क्र.१५ (अ)/का- नऊ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक:- १४ मे, २०१९.

पहा : १. केंद्र शासनाचे पत्र क्र. ११०१७/८/२०१७-JUS-II, न्याय विभाग, विधि व न्याय मंत्रालय, नवी दिल्ली दि.१६.०१.२०१८
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.B(W)A-२१०१ of २०१८, दि.२४.०२.२०१८
३. शासन अधिसुचना क्र.SPC १३१८/C.R.१५/D-IX, दि.२७.०२.२०१८

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या दि.१६.०१.२०१८ च्या पत्रात नमुद केल्यानुसार, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल WP (Civil) No.६९९/२०१६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दि.१.११.२०१७ आणि दि.१४.१२.२०१७ च्या न्यायनिर्णयानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनास मा. संसद सदस्य आणि विधिमंडळ सदस्य यांचा समावेश असलेली फौजदारी प्रकरणे निकाली काढण्यासाठी एक योजना बनविण्याचे आदेश दिले होते. सदर निर्णयास अनुसरुन न्याय विभाग, केंद्र शासनाने योजना बनविलेली असून सदर योजनेस मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दि.१४.१२.२०१७ च्या आदेशात मान्यता दिली आहे. सदर योजनेनुसार महाराष्ट्र राज्यात एक विशेष न्यायालय मंजूर झाले आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.१ येथील पत्रास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आला होता. मा. उच्च न्यायालयाकडून प्राप्त प्रस्तावास अनुसरुन मा.संसदीय सदस्य आणि विधिमंडळ सदस्य यांचा समावेश असलेली फौजदारी प्रकरणे चालविण्यासाठी एक विशेष न्यायालय दि.२७.२.२०१८ च्या शासन अधिसुचनेनुसार स्थापन/विनिर्दिष्ठ करण्यात आले आहे. त्यानुसार महानगर न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र. २५, माझगाव हे न्यायालय विशेष न्यायालय म्हणून स्थापन/विनिर्दिष्ठ करण्यात आले आहे. सदर न्यायालयाच्या operational expenditure करिता केंद्र शासनाकडून वित्तीय सहाय्य (१००%) पुरविण्यात येणार आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधीकरीता स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मा. संसद सदस्य आणि विधिमंडळ सदस्य यांचा समावेश असलेली फौजदारी प्रकरणे चालविण्यासाठी एक विशेष न्यायालय दि.२७.२.२०१८ च्या शासन अधिसुचनेनुसार स्थापन/विनिर्दिष्ठ करण्यात आले आहे. सदर विशेष न्यायालयाकरीता केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य पुरविण्यात येणार असल्याने त्याकरीता वित्त विभागाने आणि महालेखापाल कार्यालयाने दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे नविन लेखाशिर्ष उघडण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

मागणी क्र. जे-१, २०१४- न्यायदान १०८ फौजदारी न्यायालये (००) (००)(०२) विशेष फौजदारी न्यायालये (दत्तमत)(अनिवार्य)(१००% केंद्रीय सहाय्य) (२०१४०६५५) ०१- वेतन ०६- दुरध्वनी, वीज व पाणी शुल्क १३- कार्यालयीन खर्च	Demand No. J-1 2014, Administration of Justice 108 Criminal Courts (00) (00)(02) Special Criminal Courts (Voted) (Committed) (100% Central Share) (20140655) 01- Salary 06- Telephone, Electricity and Water Charges 13- Office Expenses

सदर शासन निर्णय प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ख.वि/चा-१/विधि व न्याय विभाग/यूओआर-४३/२०१७-१८/३९२, दिनांक ०७.०७.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१९१/अर्थ ११, दि.१२.१०.२०१८ व क्र.१८६/२०१९/व्यय-५, दि.२७.०२.२०१९ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०५१४१५४८३२९९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh
Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.05.14 15:54:50 +05'30'

(अ.श्या.कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे स्वीय सहायक,

२) मा. मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांचे स्वीय सहायक,
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांचे स्वीय सहायक,
५) मा. राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे स्वीय सहायक,
६) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) एक/दोन, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
८) मा. मुख्य सचिवांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रबंधक (निरीक्षणे१ व २), उच्च न्यायालय, मुंबई.
११) प्रबंधक (अर्थसंकल्प व वित्त), उच्च न्यायालय, मुंबई.
१२) प्रधान न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई
१३) मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी, मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी कार्यालय, मुंबई.
१४) वित्त विभाग (कार्या. व्यय-५, अर्थसंकल्प-११).
१५) विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने व शाखा.
१६) निवडनस्ती.